PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 1

# सदानंद देशमुख यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक समस्या

**सौ. नयना सुर्यकांत लोखंडे**
डी. एस. हायस्कूल, शीव, मुंबई -४०००२२
**महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना:-**

जागतिकीकरणाने केलेल्या वेगवान वाटचालीचे प्रतिबिंब ग्रामव्यवस्था , ग्रामसंस्कृती वर उमटले. शेतकरी गावगाडा, सावकार, शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगार, प्रतिकूल, परिस्थितीला समोर जात होते. सरकारी योजना तंत्रज्ञानाचा विकास प्रसारमाध्यमाचा प्रसार ग्रामीण भागात झाला असला तरी आजही ग्रामीण भागातील मूळ प्रश्न कायम आहेत. ग्रामव्यवस्थेतील नवीन बदलांमुळे नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. नवीन सरकारी यंत्रणा, बँक, यांत्रिकीकरण, राजकीय नेते यामुळे या समस्यांमध्ये भर पडली आहे. शेती चा केवळ धान्यउत्पादनासाठी वापर न होता आता बिल्डर, उद्योगधंदेवाले व्यापारी, सावकार, यांनी शेतजमिनीवर आपले लक्ष केंद्रित केले. त्यामुळे समाजातील शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या नव्या शोषक घटकांची भर पडली. हे सारे घडत असताना शेती करणारी माणसे विस्थापित झाली. नवीन पिढी चंगळवादी बनली व श्रामप्रतिष्ठेपासून दुरावली. या संपूर्ण परिवर्तनामुळे शेतकऱ्यांचा आत्मसम्मान गेला व त्याने आत्महत्येचा मार्ग निवडला. शेतकऱ्यांचा आत्मनाश ओढवून घेणारे आत्मभान १९९० च्या दशकातील साहित्यातून आविष्कृत झाले. माणसातील माणुसकी संपवणारी मूल्यव्यवस्था त्यामुळे माणसे आत्मकेंद्रित झाली. या सर्व परिस्थितीचे पडसाद तिसऱ्या पिढीतील ग्रामीण साहित्यिकांच्या साहित्यातून उमटू लागले.

**समकालीन लेखकांची पार्श्वभूमी:-**

१९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीकारांनी अनेक वास्तववादी विषय आपल्या साहित्यातून मांडले. 'बिनपराचा कावळा' (अनिल सोनार), 'कोंडणातलं जीणं' (नागनाथ पाटील), या कादंबऱ्यातून ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या भ्रष्टाचार व राजकारणग्रस्त परिस्थितीचे वर्णन

केले आहे. 'फुफाटा' (सुनंदा देशमुख), 'अंगार कूसा' (भीमराव वाघमारे), 'लाडी' (रामचंद्र नलावडे), यासारख्या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील स्त्रीच्या वाटयाला येणारे दु:खाचे दशावतार प्रकट झाले आहेत. 'निशाणी डावा अंगठा' (रमेश इंगळे उत्तारांदकर), 'गव्हाणी' (शांता जोशी), 'डेअरी' (साईनाथ पाचारणे), 'भाऊबंद' (विजय जावळे), या कादंबऱ्यातून ग्रामीण राजकारणाची वास्तवता त्यातील मूल्यहीनता, भयानकता प्रकट होते. 'धिंगाणा' (राजन गवस), या कादंबरीतून तरुण मनाची विमनस्कता प्रकट होते. रवींद्र शोभणे यांची 'पाढरं' ही कादंबरी दुष्काळाचे चित्रण करते. 'बुढाई' (प्रतिभा इंगोलो), यांचा कादंबरीत चर्मकार समाजातील महिलेची फरफट चित्रित केली आहे. 'चाळेगत' (प्रवीण बांदेकर), 'गावठाण' (कृष्णात खोत), 'पाडा' (अशोक कोळी), या कादंबऱ्यानी ग्रामीण समस्या चा वेध घेतला.

ग्रामीण साहित्यिकाच्या तिसऱ्या पिढीतील लेखक सदानंद देशमुख यांनी वास्तवातून जाणवणाऱ्या मूल्यजाणिवांचा प्रगल्भतेने विचार करून वाचकांसमोर मांडले. त्यांच्या 'तहान', 'बारोमास' व 'चारीमेरा' या तीन कादंबऱ्यातून समाजातील वास्तव समस्यांचा वेध घेतला आहे. लेखक असूनही कृषीसंस्कृतीशी अजूनही नाळ जोडून असलेले सदानंद देशमुखांनीआपल्या सूक्ष्मनिरीक्षणाने व स्वानुभवाने ग्रामीण परिसरातील सामाजिक समस्यांचा वेध आपल्या कादंबरीवाङ्:मयातून घेतला आहे.

## सदानंद देशमुख यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक समस्या*

### १) पाणीटंचाई:

सदानंद देशमुख यांनी आपल्या पहिल्या कादंबरीत 'तहान' मध्ये पाणीटंचाईची भीषण सामाजिक समस्या मांडली आहे. तीस दिवसाच्या कालावधीतील पाण्याची तीव्र टंचाई या कादंबरीतील अठ्ठावीस प्रसंगातून रेखाटली आहे.या या कादंबरीत पाण्याची टंचाई, त्यामुळे निमाण होणाय्रा समस्या, पाण्यासाठी तडफडणारी माणसे, पाण्यासाठी केलेली अनैतिकता, नीतीहीनता इत्यादीचे चित्रण विविध व्यक्तीरेखांच्या आधारे केले आहे. या कादंबरीतील बबन शेवाळे पाणीविक्रीच्या व्यवसायातून पैसा कमावतो. परंतु त्याचा उपयोग भैतिक सुखासाठी करतो. पैशाच्या जोरावर रत्नाचा शरीराचा उपभोग घेतो . तसेच ग्रामीण भागातील लोकांच्या पाण्यासाठी होणारी वणवण, मारामारी, खून यांचे वर्णन या कादंबरीतून केले आहे.

'चारीमेरा' या कादंबरीतून पाणीटंचाईमुळे आपल्या शेतात पीक घेऊ न शकणाऱ्या सुशिक्षित शेतकऱ्यांची उदेभानची चिंता व्यक्त केली आहे.

**(२) सुशिक्षित बेरोजगारांची समस्या :**

जागतिककरणाने शिक्षणाचा प्रसार खेड्यापर्यंत झाला पण ग्रामीण भागात सरकार रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करू न शकल्याने सुशिक्षित बेरोजगारांची समस्या निर्माण झाली. सदानंद देशमुखांनी 'तहान' , 'बारोमास' , या कादंबऱ्यातून ही समस्या व्यक्तिरेखांच्या आधारे तीव्रतेने मांडली आहे. 'तहान' कादंबरीतील सतीश मंगळे व प्रमोद नवले सुशिक्षित असूनही नोकरी नसल्याने सतीश वेल्डिंगचे दुकान टाकतो तर प्रमोद नवले जनरल स्टोअर्सची टपरी टाकतो. बबन शेवाळे पाणीटंचाईमुळे शेतीव्यवसाय न करता बैलांचा वापर करून पाणीविक्रीचा व्यवसाय करतो. वरील पात्रे हा व्यवसाय करताना समाधानी नाहीत परंतु नोकरी नसल्याने नाइलाजाने त्यांना व्यवसाय करावा लागतो.

'बारोमास', कादंबरीतील एकनाथ उच्चशिक्षित असूनही नोकरी नसल्याने शेतीकडे वळतो. तर त्याचा भाऊ मधू गुप्तधनाच्या शोधार्थ सोनेरी टोळीत सामील होऊन गुन्हेगारीकडे वळतो. सदानंद देशमुखांनी 'तहान' व 'बारोमास' या कादंबऱ्यातून आजच्या काळातील सुरक्षित बेरोजगारांची ज्वलंत समस्या मांडली आहे.

**३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या :**

जागतिकीकरणाच्या आक्रमणामुळे घरातील माणसांची दुभंगलेली मने, आर्थिक स्थैर्य नसल्याने कुटुंबकलह, शिवाय शेतकऱ्यांच्या असहायतेचा फायदा घेणारे सावकार, भ्रष्ट शिक्षणक्षेत्र, अस्मानी संकटे, लहरी निसर्ग यामुळे हतबल शेतकरी आत्महत्याकडे वळतो याचे चित्रण सदानंद देशमुखांनी 'बारोमास' या कादंबरीत केले आहे. दगडू महाकाळ कडून आपला कल्याणीचा मळा परत मिळणार नाही हे कळताच जातिवंत शेतकरी सुभानराव ओढ्यात जीव देऊन आत्महत्या करतो. तर 'तहान' कादंबरीतील पुंजाजी पारखेडला लागलेल्या आगीमुळे उद्ध्वस्त झालेल्या गावाची नैतिक जबाबदारी स्विकारत आत्महत्या करतो. 'बारोमास' मधील एकनाथचा मेहुणा रावसाहेब सावकाराचे पाच हजार रुपये देऊ न शकल्याने आत्महत्या करतो. नरुभाऊच्या मनात शेतीत सतत होणाऱ्या

नुकसानी मुळे आत्महत्या करण्याचे विचार मनात येतात. एकूण सदानंद देशमुख जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या शेतकऱ्याच्या आत्महत्या या ज्वलंत प्रश्नाकडे आपले लक्ष केंद्रित करतात.

**४) चंगळवादी वृत्ती:**

जागतिकीकरणामुळे तंत्रज्ञान, शिक्षण, प्रसारमाध्यमे गावापर्यंत पोचली याचा प्रभाव नवीन पिढीवर झाला व त्यामुळे नवीन पिढी श्रमप्रतिष्ठेपासून दुरावली व कमी श्रमात जास्त मोबदला मिळवण्याच्या ओढीत गुन्हेगारीकडे वळली. तहान कादंबरीतील प्रमोद नवले हा बबन कडून त्याचे प्रेमप्रकरण लपविण्यासाठी पैसे उकळतो. या कादंबरीतील रत्नाला कष्टाचे काम आवडत नसल्यामुळे ती पैश्यासाठी बबनला आपले शरीर सोपवते. बारोमास मधील मधु झटपट पैसे मिळवून श्रीमंत होण्यासठी रात्रभर गुप्तधनाच्या शोधार्थ फिरतो व त्यात अपयशी ठरल्यावर गुन्हेगारी जगाकडे वळतो. अलका आपली भौतिक सुखाची गरज न भागल्यामुळे एकनाथला सोडून देते व स्वतःचे करिअर घडवितो. सदानंद देशमुखांनी तहान व बारोमास या कादंबरीतील पात्रांच्या माध्यमातून नवीन पिढीच्या चंगळवादी वृत्तीचे दर्शन घडविताना नैतिक मूल्यांचा होणाऱ्या ऱ्हासाबाबत चिंता व्यक्त करीत समाजातील नवीन पिढीच्या या समस्येबाबत विचारप्रवृत्त केले आहे.

**५) अंधश्रद्धा :**

शेतकऱ्यांच्या जीवनात आजही अंधश्रद्धेला स्थान आहे.शेतकरी अनेक समस्यांनी ग्रासलेला असल्याने तो दैववादी बनला आहे त्यामुळे त्याचा फायदा समाजातील ढोंगी साधू घेताना दिसतात. 'चारीमेरा' या कादंबरीतील भावनाताई आपल्या कुटुंबातील समस्यांच्या निवारणासाठी शादेबाबाच्या नादी लागते. 'बारोमासमधील' मधू गुप्तधनाच्या शोधासाठी बनुबा मांत्रिकाची मदत घेऊन अघोरी कृत्ये करतो. सदानंद देशमुखांनी वरील पात्रांच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धेची समस्या मांडली आहे.

**६) आंतरजातीय विवाह :**

आपल्या संस्कृतीशी एकनिष्ठ असलेला शेतकरी जातव्यवस्थेला महत्व देताना आंतरजातीय विवाहाला विरोध करताना दिसतो. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात तहान कादंबरीतील रत्ना व बबन चा विवाह जातीभेदामुळे होऊ शकत नाही त्यामुळे हे प्रेमप्रकरण लपविण्यासाठी बबनला आपली सर्व कमाई दयावी लागते. ‘चारीमेरा’ तील उदेभानचे प्रविणाशी लग्न झाल्यामुळे प्रवीणाचे आयुष्य उदध्वस्त होते व उदेभान नेहमी तिच्या आठवणीने व्याकूळ होतो. शेतकऱ्याला मुलीच्या लग्नात हुंडा देण्यासाठी शेत विकावे लागते त्यामुळे भूमिहीन होऊन दारिद्र्यात जगावे लागते तरीही आंतरजातीय विवाहाला मान्यता देण्याचे तो नाकारतो हे सत्य सदानंद देशमुख यांनी तहान, ‘चारीमेरा’ या कादंबऱ्यातून मांडले आहे.

**७) शेती व्यवसायतील समस्या :**

जागतिकीकरणामुळे ग्रामीण जीवनात परिवर्तन घडून आले. शेतीच्या यांत्रिकीकारणामुळे शेती खर्चिक झाली.त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला. व सावकारी पाशात अडकला. महागाई, पाणीटंचाई, नापीकी बेकारी यामुळे पिचलेल्या शेतकऱ्याच्या जीवनातील संघर्ष सदानंद देशुमुखांच्या कादंबरीतून दिसतो. तहान मधील राघोजी शेवाळे जातिवंत शेतकरी असूनही पाणी नसल्याने शेतात पिक घेऊ शकत नाही. ‘बारोमास’ मधील सुभानराव दगडू महाकाळकडे गहाण असलेल्या शेतात तो गांजा लावणार हे ऐकताच अस्वस्थ होतो. चारीमेरातील उदेभान सतत पिकांवर पडणाऱ्या विविध रोगांमुळे आर्थिक टंचाईत सापडतो. शेतकऱ्याच्या जीवनातील या समस्यांचे चित्रण सदानंद देशमुख यांच्या कादंबरीत आढळतो.

या शिवाय अनैतिकता, अज्ञान, रितीरिवाज, रूढी, मूल्य संस्कृतीचा ऱ्हास, आधुनिक जीवनशैली इत्यादी समस्यांचा वेध सदानंद देशमुखांनी त्यांचा कादंबरी वाङ्:मयातून घेतला आहे. सदानंद देशमुखांच्या साहित्यांचा केंद्रबिंदू शेतकरी असल्याने ग्रामीण परिसरातील वास्तव सामाजिक समस्यांचे चित्रण त्यांचा कादंबरीतून दिसून येते.

## समारोप :

सदानंद देशमुखांनी ‘तहान’, ‘चारीमेरा’, ‘बारोमास’ या कादंबऱ्यांतून आजच्या काळातील वास्तव सामाजिक समस्यांचा वेध घेतला आहे. पाणीटंचाई, सुशिक्षित बेरोजगारांची समस्या,

शेतकऱ्यांच्या आत्महत्या नवीन पिढींची चंगळवादी वृत्ती, अंधश्रद्धा, आंतरजातीय विवाह, शेतकऱ्यांच्या समस्या इत्यादी समस्यांचे स्वानुभव व आत्मचिंतनातून वास्तववादी चित्रण केले आहे.

## संदर्भ सूची :

१) सदानंद देशमुख, 'तहान' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र.आ १९९८
२) सदानंद देशमुख, बारोमास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, दु.आ.२००५
३) सदानंद देशमुख, 'चारीमेरा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ.२०१६
४) डॉ. प्रवीण बनसोडे, प्रा. शांतारक्षित गावडे, 'जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य', कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद-४३१००५.